PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 9, ISSUE 4

# संत श्री भय्याजी महाराज वर्णित ज्ञानयोग

**श्री प्रभाकर हिरामण बावणे**
**संशोधक,**
**जी. एस. कॉलेज ऑफ योगा अँड कल्चरल सिंथेसिस, कैवल्यधाम लोणावळा, पुणे (महाराष्ट्र) भारत**

**डॉ. बंदिता शतपथी**
**मार्गदर्शक आणि प्राचार्या,**
**जी. एस. कॉलेज ऑफ योगा अँड कल्चरल सिंथेसिस, कैवल्यधाम लोणावळा, पुणे (महाराष्ट्र) भारत**

**सारांश :-**

संत श्री सुखदेवजी बुधोलिया उपाख्य भय्याजी महाराज यांच्या मते ज्ञानयोग या शब्दाचा अर्थ,'तत्वचिंतनाने, ईश्वराशी संयोग घडवून आणून, त्याच्याशी ऐक्य पावणे असा आहे. श्रीगुरू/ दिव्य पुरुषाकडून प्राप्त झालेल्या दिव्य नामाचे स्मरण व स्वानुभवातून प्रकट झालेले सखोल ज्ञानाची आवश्यक असून ईश्वराशी अनुसंधान लावणे ही ज्ञानयोगातील मुख्य साधना असल्याचे भय्याजी महाराज सांगतात. ज्ञानयोगात बुद्धीचे मुख्यकार्य असून ज्ञान ही बुद्धीची प्रेरणा आहे. सत्त्व, रज, तम हे तीन गुण परस्परांना दाबणारे व परस्परातून उत्पन्न होणारे असून शुद्ध सत्त्व वाढले तर ते ज्ञानाला साध्य करून देते. कैवल्याच्या मार्गात या सत्त्व गुणास देखील त्यागावे लागते. सत्, चित् व आनंद हे तिन्ही गुण एकरूप असून हे येणेपरी क्रमप्राप्तच असल्याचे भ. महाराज सांगतात. या ज्ञानाचा आश्रय घेतल्याने मुमुक्षुजन अहंभावातून नम्रतेकडे, असत्यातून सत्याकडे, अज्ञानातून ज्ञानाकडे, विशादातून आनंदाकडे व पारतंत्र्यातून स्वातंत्र्याकडे जात असल्याचे भय्याजी महाराज म्हणतात.

'मी मर्त्य देह नसून मी अजय ब्रह्म आहे. हे अनुसंधान दृढ झाल्यामुळे आत्मतत्वाचे सत्य ज्ञान होईल व त्याला परम आनंद शाश्वत सुख लाभेल. असा भय्याजी महाराजांच्या मते ज्ञानयोगाचा अर्थ असल्याचे निष्पन्न होते. भ. महाराज म्हणतात की, ज्ञानाने नित्यानित्य विवेक अंत:करणात ठसून ब्रह्म नित्य व संसार अनित्य, ही सत्यता जाणीवपूर्वक पटली म्हणजे त्यातून संसाराविषयी वैराग्य व निरतिशय प्रेमभक्ती निर्माण होत असून हेच

प्रायत: ज्ञानाचे प्रमुख कार्य होय. जीवाला ज्ञान झाल्यावर ब्रह्म प्राप्तीची इच्छा ज्ञानातून निर्माण होवून नंतर या दृढ इछेच्या परिपुर्तीकरिता श्रद्धा, सम्मिलीत ज्ञानभक्ति, प्रेम पाहिजे. तसेच भक्तीची सफलता सामावली आहे असे ध्यानयुक्त गुरु निर्देशित अखंड नामस्मरणाची जोडीने ज्ञानयोग साध्य होत असल्याचे भ. महाराज सांगतात.

**ज्ञानयोग :-**

जीव स्वरूपत: अनंत, अमर, अजर, सच्चिदानंद ब्रह्म असून मायेच्या आवरणाने त्याला स्व-स्वरूपाचा विसर पडला व भ्रमाने 'मी देह आहे' असे तो मानू लागून देहाशी तादाम्य पावल्यामुळे देहाच्या सुख-दु:खाच्या वासनात तो बद्ध झालेला असून वासना तृप्तीकरिता हा मनुष्य कर्म करू लागला. कर्मातून सुखदु:ख आणि सुख-दु:खातून पुन्हा वासना कर्म असे चक्र अविरत सुरु होत असल्याचे वर्णन भ. महाराज अध्यात्मपर प्रार्थना ग्रंथात करतात. ज्ञानेश्वर महाराज देखील ज्ञानेश्वरी मध्ये पुढील प्रमाणे दाखला देवून सांगतात की-

"वृत्तिऐसें मन धरिती | मनाऐसी क्रिया करिती |

केलियाऐसीं वरिती | मरोनि देहें ||" (संत, श्रीज्ञानेश्वरी -गुढार्थ दीपिका)

श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात की, प्राणीमात्रांमध्ये वृत्ति स्फुरून प्राण्यांचे मनच वृत्तिरूप होते. मन ज्या प्रकारचे वृत्तिरूप होते, त्याप्रमाणे प्राण्यांकडून क्रिया घडते आणि मरणानंतर त्या कर्माप्रमाणे त्याला देह प्राप्त होतो.

"अनोन्या भी भवा श्रय जनन मिथुन वृत्तय श्चय गुणा:"| (ईश्वरकृष्ण)

सत्त्व, रज, तम हे तीन गुण परस्परांना दाबणारे व परस्परातून उत्पन्न होणारे असून वृत्तिरूप कोणत्याही एका गुणाचे प्राबल्य वाढले असता इतर गुण दाबले जातात. शुद्ध सत्त्व वाढले तर ते ज्ञान प्राप्तीस सहाय्यभूत ठरून ज्ञान साध्य करून देत असल्याचे वर्णन सांख्यदर्शनात येते.

सत्, चित् व आनंद हे तिन्ही गुण एकरूप असून हे येणेपरी क्रमप्राप्तच असल्याचे भ. महाराज सांगतात. हे वरवर जरी पृथक भासत असले तरी तत्वत: अभिन्नच असून दिव्य शक्ती दिव्य ज्ञानातून चिरंतन दिव्यानंदमय असून तिच्या आश्रित झाल्यास मुमुक्षु अहंभावातून नम्रतेकडे, असत्यातून सत्याकडे, अज्ञानातून ज्ञानाकडे, विशादातून आनंदाकडे व पारतंत्र्यातून स्वातंत्र्याकडे जात असल्याचे भय्याजी महाराज म्हणतात. (महाराज)

मृत्यू समयी शेष वासना बरोबर घेवून लिंगदेह बाहेर पडत असून तो दुसऱ्या शरीरात जन्म घेतो. तेथेही हीच अवस्था, देहतादात्म्य शेष असल्याने या शरीरात सुद्धा पूर्वीचे वासना कर्म हे द्वंद्व चक्र पुन्हा वेगाने सुरु होते. असे जन्म-मृत्यू-जन्माचे चक्र फिरत राहते. "मी देह नाही, मी सत्, चित्, आनंद ब्रह्म आहे. मी आत्मा आहे." हे ज्ञान दृढ झाल्यावर देहतादात्म्याचा निरास होवून देहभ्रम सुटला म्हणजे वासनात्मक क्रिया कर्माचरण थांबते,

त्याचबरोबर जन्ममरण हा फेरा संपतो. मी ब्रह्म असून अजय अविनाशी असल्याचे स्वानुभवाने, दृढभावाने जाणले असता आत्मतत्वाचे खऱ्या ज्ञानाचा बोध होत असून त्याने संसारा आसक्ति नाश पावून वैराग्यतसेच विवेक जागृती होत असल्याचे भ. महाराज म्हणतात.

"बहूनां जन्मनामन्ते ज्ञानवान्मां प्रपद्यते |

वासुदेव: सर्वमिति स महात्मा सुदुर्लभ: || (प्रभुपाद श. भ.)

वरील श्लोकात भ. गीतेत श्रीकृष्ण सांगतात की, हा मनुष्यजन्म संपूर्ण जन्मांचा आदी जन्म असून अंतिम जन्मही आहे. मनुष्य जन्मत: सर्व काही परमात्माच असून अशाप्रकारे जो ज्ञानवान जाणून भगवंताला शरण जातो, तो महात्मा अत्यंत दुर्लभ असल्याचे श्रीकृष्ण भगवान म्हणतात.

**ज्ञान :- परोक्ष व अपरोक्ष**

अस्तिब्रह्मेति चेद्वेद परोक्षज्ञानमेव तत् |

अहं चेद्वेद साक्षात्कार: स उच्चते ||

ज्ञान दोन प्रकारचे असून ते परोक्षज्ञान व अपरोक्षज्ञान आहे. परोक्षज्ञान म्हणजे शाब्दिक ज्ञान आणि अपरोक्ष ज्ञान म्हणजे प्रत्यक्ष अनुभूती. मुमुक्षुला आत्मानंद स्वरूपाचे म्हणजे ब्रम्ह स्वरूपाचे ज्ञान अत्यंत आवश्यक असल्याचे भ. महाराज सांगतात.

जुने संस्कार भोगणे, नवीन न निर्मिणे |

जाणतेपणी जाणे, देवाकडे || (महाराज भ. )

आपल्या बुद्धीची दिशा आत्मप्रकाशाकडे असल्यास, छायारूपी माया आपल्या मागे राहील. संत भय्याजी सांगतात की, आपल्यास एक आत्माकार जीवनच तारक असून जुने संस्कार निमुटपणे भोगावे व नव्याची निर्मिती करू नये. ज्ञानांतून स्व-स्वरूपाचे अनुसंधान साधने चांगले असल्याचे भ. महाराज म्हणतात. सर्वाघटी परमेश्वर आत्मरूपाने विराजमान असल्याने अशी शंका निर्माण होते की, कुणी कुणाला नमस्कार करावा? या शंकेचे निराकरण भय्याजी पुढील ओवीतून करतांना म्हणतात-

शंकेचे हें समाधान, ज्यास अपरोक्ष ज्ञान |

त्यांशीं सरळ शरण, रिघावें ||२०|| (भय्याजी)

ज्यास आत्मसाक्षात्कार झाला आहे अशा दिव्य पुरुषाची अनन्यभावे शरणागती पत्करावी असे मार्गदर्शन भ.महाराज मुमुक्षुंना करतात.'ब्रह्म आहे' असे जाणले, तर तेच परोक्षज्ञान होते व 'मी ब्रह्म आहे' असे जाणले की तोच साक्षात्कार असून 'ब्रह्म आहे' असे निश्चित ज्ञान, ही परोक्ष विद्या व 'मी ते' असे स्वनुभावाने झालेले ज्ञान ही अपरोक्ष विद्या आहे. यावरून असा निश्चय होतो की, प्रथम परोक्ष ज्ञान व नंतर अपरोक्ष ज्ञान.

असत्वांशो निवर्तेत परोक्षज्ञानतस्तथा |

अभानांशनिवृत्ति: स्यादपरोक्षधिया कृता || (मुनि प. श.)

परोक्षज्ञानाच्या योगाने असत्वाशांची निवृत्ति होते व त्याचप्रमाणे अपरोक्षज्ञानाच्या योगाने अभानांशाची निवृत्ति होते.

**ज्ञानाचे महत्त्व :-**

न ही ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते |

तत् स्वयं योगसंसिध्द: कालेनात्मनि विन्दति ||

(श्रीमद्भगवद गीता- साधक संजीवनी)

मन ज्याविषयी अनभिज्ञ आहे, ज्या गोष्टींची माहितीच नाही, त्याविषयी प्राप्तीची प्रेरणा, इच्छा होणेच शक्य नाही. ज्ञान, ज्ञान प्राप्तीची तीव्र इच्छा आणि अविरत प्रयत्न हे महत्वपूर्ण सूत्रच असल्याचे भय्याजी महाराज सांगतात. कोणत्याही गोष्टींचे प्रथम ज्ञान व्हावयास पाहिजे. येथे ज्ञान म्हणजे जाणीव असून ती वस्तु आहे, असे कळल्यावर मग मनुष्याला तिच्या प्राप्तीची इच्छा होते. ती गोष्ट आपणाला पाहिजे ही त्याची धारणा बनून इच्छा झाल्यावर तिच्या परिपूर्तीकरिता तो मग प्रयत्नांची पराकाष्ठा करितो. "जे कधी ऐकले नाही, ज्याचे बुद्धीलाही ज्ञान झाले नाही, ते करण्याची वृत्ति तरी कशी होईल? " म्हणून जीवनाची अपूर्णता जाणवू लागल्यावर परमार्थ मार्ग स्वीकारावा. आणि परमार्थमार्गाची पहिली पायरी आहे 'श्रवण' असल्याचे भय्याजी महाराज सांगतात.

गुरुवाक्ये उठविला | बोधी निश्चयो आपुला |

न्याहाळी हातिऊ घेतला | आरिसा जैसा || (ज्ञानेश्वर)

आरशांत मुख पहावे त्याप्रमाणे गुरूच्या वाक्यांनी जागृत झालेल्या स्वरुप बोधात तो साधक आपले मुख बघतो म्हणजे ' तू ब्रह्म आहेस' असे गुरुंनी सांगितलेले दृढ स्वानुभवाने पटवून घेतो. गुरूकडून सत्संग श्रवणाने स्वरुपबोध त्याला मिळाल्याने त्याचा ज्ञानप्राप्तीचा मार्ग सुकर होत असल्याचे श्री ज्ञानेश्वर महाराज सांगतात.

सौंदर्य, सामर्थ्य, ज्ञान- पावित्र्य नि प्रेमपूर्ण |

विलसलें या रूपें- विश्वकल्याण हेतू ||२ ||

आरती प्रेमभावें ||

जाहली कृपा आतां – जाणवते अपूर्णता |

दयावंता महाराजा – उजळावी जीवज्योती || ३||

आरती प्रेमभावें || (महाराज भ. )

मानवी जीवन सर्वतोपरी परिपूर्ण नाही. मग अपूर्णता कोणती ? अपूर्णतेचे कारण काय ? असल्यास तिचे मूळ कशात आहे ? पूर्णता कशी लाभेल? अपेक्षित पूर्णता शक्य आहे काय? असल्यास तिच्या प्राप्तीचा मार्ग कोणता ? असे अनेक प्रश्न साधकांच्या वा सामान्य माणसांच्या मनापुढे उभे राहतात. जीवनांतील अपूर्णता प्रत्येकाला जाणवते पण पूर्णतेचे स्वरूप मात्र स्पष्ट दिसत नसून तो विविध उपासना आचरतो. परंतु शेवटी त्याला काहिंच साध्य होत नाही. या गूढाचे आकलन होण्याकरिता साधकाच्या जीवनांत ज्ञानाला फार महत्त्व आहे. आत्मज्ञानानेच आत्मसुखाची प्राप्ती होत असून त्याकरिता दिव्य पुरुषाची शरणागती साधने आवश्यक असल्याचे भय्याजी महाराज सांगतात.

**ज्ञान हेच कैवल्याचे साधन:-**

ज्ञानयोग या वचनात 'ज्ञान' या शब्दाचा अर्थ अनुभूती असा आहे. प्रत्यक्ष पण अतींद्रिय, प्रतीभदर्शन म्हणजे ज्ञान असून कैवल्याकरिता हे ज्ञान अति आवश्यक आहे.भय्याजी महाराज सांगतात की, अनुभवरूप ज्ञानाच्या प्राप्तीचे साधन आहे अखंड नामस्मरण, ध्यानप्रधान भक्ति आणि निष्काम गुरुसेवा.

धावं ती इच्छाशक्ति, सम्मीलित ज्ञान भक्ति |

आपुली शरणागति, साधावया || (भय्याजी)

दु:खरहित अक्षय सुखाच्या प्राप्तीकरिता मुमुक्षुचि मोक्षरूप इच्छा असून ती साध्य करण्याकरिता दिव्य पुरुषांची शरणागति साधने आवश्यक असल्याने भावनेतून इच्छाशक्ती, बुद्धीतून ज्ञानशक्ती- मेधा व प्रार्थनेतून भक्तीरस असा अध्यात्मपर प्रवास होत असल्याचे भय्याजी महाराज सांगतात. ज्ञानाशिवाय भक्ति टिकत नसून त्याकरिता तिला ज्ञानाची जोड पाहिजे. भक्ति फळाला आली तरी ज्ञान तिला आपल्या मुलभूत प्रार्थनेची- शरणागतीची अखंड दिशा दाखवीत असल्याचे भ. महाराज म्हणतात.

सिद्धीं प्राप्तो यथा ब्रह्म तथाऽप्नोती निबोध में |

समासेनैव कौन्तेय निष्ठा ज्ञानस्य या परा || (प्रभूपाद)

भगवान म्हणतात - अर्जुना, ही ज्ञाननिष्ठा योग्यतारूप सिद्धी ज्याला प्राप्त झाली, त्याला ब्रह्माची प्राप्ती होत असते. ही जी ब्रह्मप्राप्ती, तीच ज्ञानाची परमसीमा असून हेच कैवल्य असल्याचे गीतेत वर्णन आलेले आहे.

"तैसें आपुलें नेणणें | फेडिजे कां जाणणें| तेंहि गिळूनी असणें | ऐसी जें दशा||

तियेपरतें कांही | निपजणें येथ नाहीं | म्हणौनि म्हणिपे पाहीं | परमसिद्धी ते ||

परी हेचि आत्मसिद्धी | जो कोणी भाग्यनिधि | श्रीगुरुकृपालबद्धी काळी पावें|"

(ज्ञानेश्वरी)

आपले अज्ञान ज्या ज्ञानाने नाहीसे केले तेहि ज्ञान वृत्तिरूप व सापेक्ष असल्यामुळे नाहीसे होवून जी स्थिती येते, त्या स्थितीपेक्षा किंवा दशेपेक्षा आता पलीकडे काहीही प्राप्त व्हावयाचे राहात नाही. म्हणूनच तिला 'परमसिद्धी' असे म्हणतात. सूर्योदय झाला म्हणजे अंधारच प्रकाश होतो, ज्योतीच्या रूपाने कपूरच दिवा होतो, मीठ पाण्यात पडताच जलरूप होते, तद्वतच दैवयोगाने ज्या भाग्यवन्ताची वृत्ति गुरुवाक्य श्रवणाने अभेद होवून स्वस्वरूपाच्या ठिकाणी स्थिर होते (ज्याला आत्मसिद्धी प्राप्त होते), त्या साधकाला मग काही एक कर्म करण्याचे कर्तव्य उरत नसल्याने हीच ज्ञानाची परमसीमा असल्याचे ज्ञानेश्वर महाराज म्हणतात. कर्मयोग हा ज्ञानयोगाचा पाया असून ज्ञानयोग हे कर्मयोगाचे शिखर आहे.

वैराग्याच्या वाटुलींत, सहाय्यक सद्गुरुनाथ |

भक्तांना भगवंत, आपुलासा || (भय्याजी)

या मार्गावरील साधकाने तीव्र वैराग्याच्या सहाय्याने या विकाररुपी श्वापदांचा हल्ला चुकविला आणि म्हणून तो सद्वासनारुपी पहाडावर सुरक्षितपणे येवून पोहोचतो तेव्हा त्यास सद्गुरूची सहाय्यक ठरतो. श्रीगुरू/ दिव्यपुरुषाकडून प्राप्त झालेल्या दिव्य नामाचे स्मरण व स्वानुभवातून प्रकट झालेले सखोल ज्ञानाची आवश्यक असून ईश्वराशी अनुसंधान लावणे ही ज्ञानयोगातील मुख्य साधना असल्याचे भय्याजी महाराज सांगतात. जीव अनित्य असून आत्मतत्व नित्य, अविनाशी असून यांस सच्चिदानंद म्हणजेच सत, चित आनंद या गुणांनी परिपूर्ण असून नेहमी अस्तित्वात असणारे आहेत.

## निष्कर्ष :-

PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 9, ISSUE 4

संत गुणाचे अस्तित्व तिन्ही काळात असून त्याच्या अधीन दिव्य शक्ती असून ज्या बुद्धिला त्याचा प्रभाव जाणवतो ती साधारण बुद्धि नसून ते दिव्य ज्ञान असल्याचे महाराज सांगतात. ही जाणीव चित गुणाचा ज्ञानप्रकाश असून त्यानेच अज्ञान अंधकार नाहीसा होवून महान शक्ती चैतन्यस्वरूप असल्याचे दिव्य दर्शन होते. यालाच भ. महाराज दिव्य दर्शन म्हणून संबोधन करतात. हे अनुसंधान दृढ झाल्यामुळे आत्मतत्वाचे सत्य ज्ञान होईल व त्याला परम आनंद शाश्वत सुख लाभेल असा भय्याजी महाराजांच्या मते ज्ञानयोगाचा अर्थ असल्याचे निष्पन्न होते.

ज्ञानाने, मनुष्याच्या अंत:करणात असणारे कामक्रोधादि विकार नष्ट करून सद्संगती करिता प्रेरित होवून साधुसंताच्या सहवासाने अप्रवृत्तीची आडवाट सुटते व सत्कर्माची सरळ वाट साधक चालतो.कर्तृत्वपद व फलास्वाद टाकून हा परमार्थाची वाट वेगाने चालत असता कर्मरूपी रात्र संपते व कर्मक्षय होवून कर्मसाम्यदशा रुपी पाहत होते. गुरुकृपारुपी दिवस उजाडतो व ज्ञानाचा प्रकाश प्राप्त होतो. संतसंगती, कर्मसाम्यदशा, सत्यसमागम, दिव्य पुरुषाची शरणागती, नामजप, आज्ञापालन त्याद्वारे होणारी श्रीगुरूकृपा, सत्संगाचे श्रवण, त्याचे मनन, निधिध्यासन असा हा उत्तरोत्तर प्रवास आत्मसाक्षात्कार घडविणारा ज्ञानमार्ग भय्याजी महाराज त्यांच्या अध्यात्मपर प्रार्थना ग्रंथात विषद केलेला आहे.

## संदर्भ ग्रंथ

ईश्वरकृष्ण. (n.d.). *सांख्यकारिका*.

ज्ञानेश्वर, स. (n.d.). *श्री ज्ञानेश्वरी -गुढार्थ*.

ज्ञानेश्वर, स. (n.d.). *श्रीज्ञानेश्वरी -गुढार्थदिपिका*. गोरखपूर: गीताप्रेस.

ज्ञानेश्वरी, स. (n.d.). *श्रीज्ञानेश्वरी*.

प्रभुपाद, श. (n.d.). *श्रीमद्भगवदगीता -साधक संजीवनी*.

प्रभूपाद. (n.d.). *भग्वादगीता*. गीताप्रेस गोरखपूर.

भय्याजी, म. (n.d.). *अध्यात्मिक प्रार्थना ग्रंथ*. ताजुद्दीन बाबा प्रकाशन.

महाराज, भ. (n.d.). *अध्यात्मपर प्रार्थना ग्रंथ*.

महाराज, भ. (n.d.). *अध्यात्मिक प्रार्थना ग्रंथ*.

महाराज, भ. (n.d.). *अध्यात्मिक प्रार्थना ग्रंथ* . ताजुद्दीन बाबा प्रकाशन.

मुनि, प. श. (n.d.). *पंचदशी*. (भ. प. विद्याभास्कर, Trans.) पं. कृष्णकुमार शर्मा ,बिजनौर.

PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 9, ISSUE 4

मुनि, म. –प. (n.d.). *पंचदशी*. (ह. भ. श्री देवचंद विशारद, Ed., & भ. प. विद्याभास्कर, Trans.) लाहौर: पंडित कृष्कुमार शर्मा पो.रतनगढ , बिजनौर .

श्रीप्रभूपाद. (n.d.). *श्रीमद्भगवद गीता- साधक संजीवनी*.

*श्रीमद्भगवद गीता- साधक संजीवनी*. (n.d.).

संत, ज. (n.d.). *गुदार्थ दीपिका*.